


२५ वा वार्षिक अहवाल
ऑडिट वर्ग – 'अ'
सन २०२०–२०२१

२५

रौप्य महोत्सव

सन २०२०–२१

हुतात्मा सहकारी बँक लि.,
ता. वाळवा, जि. सांगली.

आपल्या स्वप्नांना आकार देणारी...

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा

ता. वाळवा, जि. सांगली.

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

संचालक मंडळ



श्री. किरण नागनाथ नायकवडी
चेअरमन



श्री. महंमद अली चाऊस
व्हा. चेअरमन



सौ. नंदिनी वैभव नायकवडी
संचालिका



श्री. बाजीराव ईश्वरा मांगलेकर
संचालक



श्री. रामचंद्र हणमंत पाटील
संचालक



श्री. अर्जुन निवृत्ती वडगांवे
संचालक



श्री. दिलीप कृष्णराव पाटील
संचालक



श्री. अरुण शंकरराव यादव
संचालक



श्री. गंगाराम रामचंद्र सुर्यवंशी
संचालक



श्री. शरद रघुनाथ खोत
संचालक



श्री. आनंदराव राजाराम थोरात
संचालक



श्री. श्रीकांत तुकाराम आंबी
संचालक



श्री. नारायण हिंदूराव गुरव
संचालक



श्री. पोपट धुळाप्पा कांबळे
संचालक



श्री. बिपीन एस. शेटे
तज्ञ संचालक



श्री. श्रीनिवास एन. भोसले
तज्ञ संचालक



श्री. अशोक रामू चौगुले
मुख्य कार्यकारी अधिकारी



क्रांतिवीरांगना

सौ. लक्ष्मीबाई नायकवडी



पद्मभूषण क्रांतिवीर

डॉ. नागनाथ (अण्णा) नायकवडी



श्रीमती कुसुमताई नागनाथ नायकवडी (माईसाहेब)



स्व. अरुण (भैय्या) नायकवडी

संस्थापक-चेअरमन, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.



पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी
सौ. कुसूमताई नायकवडी (माईसाहेब)

क्षितीज आधुनिकतेचे..! नेतृत्व दूरदृष्टीचे.....!!



मा. वैभव (काका) नायकवडी

संस्थापक, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा



मा. किरण (दादा) नायकवडी

चेअरमन, हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा

श्रध्दांजली...!

अहवाल सालामध्ये बँकेचे विद्यमान व्हा. चेअरमन, श्री. महंमद अली चाऊस, आजी माजी संचालक, सभासद, हितचिंतक, हुतात्मा संकुलातील संस्थांचे आजी माजी संचालक व सभासद, कर्मचारी यांचे निधन झाले आहे. त्यांना व कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या संकटामध्ये मृत्युमूखी पडलेले देशबांधव, भारतातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि सहकार आदि विविध क्षेत्रातील दिवंगत झालेले थोर नेते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कवी, लेखक, गायक, उद्योजक, संगीतकार, खेळाडू, कलाकार, जवान, शेतकरी, कृषी तज्ज्ञ, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे आपले जीवन गमावलेल्या विविध राज्यातील बंधू-भगिनींच्या निधनामुळे या सभेस दु:ख होत आहे. सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात बँक सहभागी होत असून निधन पावलेल्या व्यक्तिंच्या पवित्र स्मृतीस आपले सर्वांचे वतीने भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली !

सर्व दिवंगतांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो हिच परमेश्वर चरणी प्रार्थना!



हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा या बँकेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. ३० ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी ठीक २.०० वाजता ''क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई नायकवडी सभागृह'' कामगार भवन, वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली, येथे अथवा सहकार आयुक्त यांचे सुचनेप्रमाणे ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (V.C.) किंवा इतर दृश्य व श्रवण संगणकीय प्रणालीद्वारे (O.A.V.M.) खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी आयोजीत केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

– सभेपुढील विषय –

१) दि. २७/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०–२१ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

४) सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

५) सन २०१९–२० या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष–दुरुस्ती अहवाल बँकेने सहकार खात्याकडे सादर केला आहे. तो वाचून स्वीकारणे.

६) सन २०२०–२१ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

७) सन २०२१–२२ या आर्थिक वर्षामधील अंदाजपत्रक मंजूर करणे.

८) सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाकरिता नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाच्या नियुक्तीची नोंद घेऊन त्यांना देणेत येणाऱ्या मेहनतान्यास मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मान्यतेने)

९) सन २०२२–२०२३ या आर्थिक वर्षाकरीता ईडीपी व कंकरंट ऑडिटर यांच्या नेमणूका करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

१०) महाराष्ट्र शासनाच्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत थकीत कर्ज रक्कमा भरण्यासाठी दिलेल्या सवलीतीची नोंद घेऊन त्यास मान्यता देणे.

११) दि. ०७/०८/२०२१ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेमध्ये सुचविलेल्या उपविधीमधील (बॉयलॉज) दुरूस्तीस मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सुचनेप्रमाणे)

१२) बँकेचे संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१३) बँकेचे स्मॉल फायनान्स बँकेत रूपांतर करणे बाबत विचारविनिमय करणे.

१४) वार्षिक सर्वसाधारण सभेस कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१५) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेल्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ – वाळवा
दिनांक – १२/०८/२०२१

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
श्री. ए. आर. चौगुले
मुख्य कार्यकारी अधिकारी

सूचना

१) वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे बँकेच्या मुख्य कार्यालयात आणि सर्व शाखांमधून सभासदांसाठी पुर्व सुचनेनुसार उपलब्ध करून देणेत येईल.

२) गणसंख्येअभावी (कोरम) सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणसंख्यापूर्तीचे बंधन राहणार नाही.

३) सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते प्रश्न दिनांक २३/०८/२०२१ पूर्वी बँकेच्या कार्यालयात लेखी सादर करावेत.

४) नवीन पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू. १,००० झाली असून ज्या सभासदांचे भागभांडवल अपुरे आहे त्यांनी ते पुर्ण करावेत.

५) नवीन पोटनियमानुसार प्रत्येक सभासदांने पाच वर्षातून किमान एकदा वार्षिक सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग महाराष्ट्र शासन यांचे दि. ३०/०७/२०२१ चे आदेशानुसार कोरोना संसर्गजन्य रोगाचे पार्श्वभूमीवर ५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी संस्थांची वार्षिक सर्व साधारण सभा ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (V.C.) किंवा इतर दृश्य व श्रवण संगणकीय प्रणालीद्वारे (O.A.V.M.) घेणेची आहे. सबब या जाहीर नोटीसीद्वारे बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, बँकेमार्फत व्हिडीओ कॉन्फरंन्सिंगद्वारे (V.C.) मार्च २०२१ अखेरील वार्षिक सर्व साधारण सभा घेता येणार असलेने आपण गुरूवातर दि. २६/०८/२०२१ अखेर पुढील बाबींची पूर्तता करावी.

   १) प्रत्येक सभासदाने त्यांचा व्हॉट्सॲप/नेट कनेक्शन असलेला मोबाईल क्रमांक बँकेच्या प्रधान कार्यालयाकडील मोबाईल क्रं. ७७७४०३६६८८ व ७७७४०११९३८ वर किंवा बँकेच्या मुख्य कार्यालयाकडील दूरध्वनी क्रं. ०२३४२-२६७८८१ वर संपर्क करून कळविणेचा आहे.

   २) सदरची माहिती नोंद करणे करिता सभासदांनी कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी ११ ते ५ या वेळेत संपर्क करणेचा आहे. यावेळी सभासदांनी आपले नाव व मोबाईल नंबर नोंद करणेचा आहे.

संचालक मंडळ

१.	श्री. किरण नागनाथ नायकवडी	चेअरमन	वाळवा
२.	श्री. महंमद अली चाऊस (दि. ७/५/२०२१ अखेर)	व्हा. चेअरमन	वाळवा
३.	सौ. नंदिनी वैभव नायकवडी महिला राखीव	संचालिका	वाळवा
४.	श्री. बाजीराव ईश्वरा मांगलेकर	संचालक	नागठाणे
५.	श्री. रामचंद्र हणमंत पाटील	संचालक	पुणदी
६.	श्री. अर्जुन निवृत्ती वडगांवे	संचालक	कवठेपिरान
७.	श्री. दिलीप कृष्णराव पाटील	संचालक	नागराळे
८.	श्री. अरूण शंकर यादव	संचालक	अहिरवाडी
९.	श्री. गंगाराम रामचंद्र सुर्यवंशी	संचालक	सुर्यगांव
१०.	श्री. शरद रघुनाथ खोत	संचालक	पडवळवाडी
११.	श्री. आनंदराव राजाराम थोरात	संचालक	गोटखिंडी
१२.	श्री. श्रीकांत तुकाराम आंबी वि.जा./भ.ज./वि.मा. प्रवर्ग	संचालक	जुनेखेड
१३.	श्री. नारायण हिंदूराव गुरव इतर मागास प्रवर्ग	संचालक	शिरगांव
१४.	श्री. पोपट धुळाप्पा कांबळे अनुसूचित जाती/जमाती	संचालक	वाळवा
१५.	श्री. बिपीन एस शेटे चार्टर्ड अकौंटंट	तज्ञ संचालक	कोल्हापूर
१६.	श्री. श्रीनिवास एन. भोसले चार्टर्ड अकौंटंट	तज्ञ संचालक	सांगली

ANNEXURE - A

Name of the Bank	:	**HUTATMA SAHAKARI BANK LTD., WALWA**
Head Office Address	:	Kamgar Bhawan, At. & P. Walwa, Tal. Walwa, Dist - Sangli. 416 313 (Maharashtra)
No. of Registration	:	SAN/WVA/BNK/0/103/96-97
Date Of Registration	:	15/05/1996
No. of RBI Licence	:	UBD/MH/1257P
Date	:	12/07/1996
Jurisdiction	:	Maharashtra State
No of branches including Head Office & Back Office	:	18
On site ATM	:	4
Extension counter	:	Nil
Membership	:	Regular - 8,385
Paid up Share Capital	:	Rs. 641.76 Lakh
Reserves & other funds	:	Rs. 5,611.22 Lakh
Deposits - Current	:	Rs. 1,549.22 Lakh
Savings	:	Rs. 8,915.23 Lakh
Cash Credit Cr. Bal.	:	Rs. 53.96 Lakh
Term	:	Rs. 27,853.97 Lakh
Total	:	Rs. 38,372.38 Lakh
Loans & Advances		
Secured	:	Rs. 23,098.72 Lakh
Unsecured	:	Rs. 1,383.08 Lakh
Total	:	Rs. 24,481.80 Lakh
Priority Sector	:	Rs. 14,783.59 Lakh
Weakar Section	:	Rs. 3,542.59 Lakh
Borrowings	:	Nil
Investment	:	Rs. 18,000.17 Lakh
Overdues (Percentage)	:	5.32%
Audit Classification	:	'A'
Profit for the Current year	:	Rs. 422.58 Lakh
Total Staff	:	107
Working Capital	:	Rs. 46,163.11 Lakh

२५ वा वार्षिक अहवाल

सन २०२०–२०२१

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

आपल्या बँकेच्या २५ व्या रौप्य महोत्सवी वार्षिक सर्व साधारण सभेस सर्वजण ऑनलाईन उपस्थित राहिलात याबद्दल मी व्यक्तीश: व संचालक मंडळातील माझे सर्व सहकारी यांचेवतीने आपणा सर्वांचे मन:पूर्वक हार्दिक स्वागत करतो.

हुतात्मा संकुलाचे संस्थापक, गोरगरीब, कष्टकरी, शेतकऱ्यांचे दैवत, सर्वसामान्यांचे व आपल्या सर्वांचे भूषण आदरणीय **पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ (अण्णा) नायकवडी** यांची ९९ वी जयंती १५ जुलै २०२१ रोजी साजरी करणेत आली. अण्णांचे कार्य म्हणजे स्वच्छ व पारदर्शक कारभाराचे प्रतीक आहे आणि हुतात्मा संकुलातील प्रत्येक घटक त्यांनी घालून दिलेल्या आदर्शाशी बांधील राहील.

मा. संचालक मंडळाच्यावतीने आपल्या बँकेच्या सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा–तोटा पत्रक व २५ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला सार्थ अभिमान वाटतो. गत आर्थिक वर्षामध्ये कोरोना सारख्या अद्‌भूत व अदृश्य महामारीच्या संकटाने संपूर्ण जगाला वेठीस धरले आहे. यामध्ये अमेरिका व युरोप यांसारखे प्रगत देशसुद्धा हतबल झाले आहेत. आपल्या देशातही मार्च २०२० पासून कोरोना प्रादुर्भाव होण्यास सुरूवात झाली. अशा या अद्‌भूत व भयानक संकटांना संपूर्ण जग सामोरे जात होते आणि आजही जात आहे. अशा स्थितीमध्ये बँकेच्या हितचिंतक, ग्राहक, सभासद आणि सेवक यांनी सुरक्षिततेसाठी काळजी घेणेचे आवाहन करीत आहे.

बँकेने गेल्या पंचवीस वर्षात भरीव प्रगती केलेली आहे. प्रगतीचा हा टप्पा गाठण्यासाठी माझे सर्व सहकारी संचालक, कार्यकर्ते, सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे कृतीशिल अथक प्रयत्न तसेच आपण सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचे भक्कम पाठबळ तसेच बहुमोल सहकार्य मिळाले आहे. तसेच

आपल्या सर्वांचा पारदर्शक कारभार, सुसंवाद आणि सांघिकवृत्ती यामुळेच बँकेला आजवरची प्रगती साध्य करता आलेली आहे हे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

* भाग भांडवल व निधी : रु. ६,२५२.९८ लाख

३१ मार्च २०२० रोजी वसूल भाग भांडवल रु. ५३४.९२ लाख इतके होते. त्यामध्ये अहवाल सालात रु. १०६.८४ लाख इतकी वाढ होऊन ३१ मार्च २०२१ रोजी वसूल भाग भांडवल रु. ६४१.७६ लाख झालेले आहे. सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षात राखीव निधी व इतर निधीमध्ये रु. ८४९.८४ लाख वाढ होऊन निधी रु. ५,६११.२२ लाख झालेला आहे. भागभांडवल व निधीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १३.५५% इतके आहे.

* ठेवी : रु. ३८,३७२.३८ लाख

३१ मार्च २०२० रोजी बँकेकडे रु. ४१,३३०.४६ लाखाच्या ठेवी होत्या. अहवाल सालामध्ये ठेवीमध्ये रु. २,९५८.०८ लाखांनी घट होवून अहवाल सालात ठेवी एकूण रू. ३८,३७२.३८ लाख इतक्या झाल्या आहेत.

* गुंतवणूक : रु. १८,०००.१६ लाख

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या CRR आणि SLR याबाबतच्या सूचनांचे काटेकोर पालन बँकेने केले आहे. आपल्या बँकेला एनडीटीएलच्या ४% रक्कम CRR व १८% रक्कम SLR म्हणून ठेवावी लागते. दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर बँकेची गुंतवणूक रू. १८,०००.१६ लाख इतकी असून त्यात सरकारी रोख्यातील गुंतवणूक रू. ९,९९४.८९ लाख तसेच इतर बँकाकडील मुदत ठेवी रू. ६,३०१.१२ लाख, लिक्विड फंड गुंतवणूक रू. १,७००.०० लाख व इतर सहकारी संस्थांच्या शेअर्समधील गुंतवणूक रू. ४.१६ लाख यांचा समावेश आहे.

* कर्ज व्यवहार : रु. २४,४८१.८० लाख

दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर अहवाल सालात बँकेच्या कर्जामध्ये रू. २,२७४.५० लाख इतकी वाढ होऊन बँकेची एकूण कर्जे रू. २४,४८१.८० लाख इतकी झाली. बँकेने अग्रक्रम क्षेत्रासाठी दिलेल्या कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ६०.३८% इतके आहे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केलेल्या कर्जपुरवठ्याचे एकूण कर्जाशी प्रमाण १४.४७% इतके आहे.

✻ भांडवल पर्याप्तता प्रमाण : (CRAR)

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण कमीतकमी ९% असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचे ३१ मार्च २०२१ रोजीचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १६.६३% इतके आहे. यापुढेही भांडवल वाढीचा वेग व्यवसाय वाढीशी सुसंगत ठेवण्याचा व CRAR चांगला राखण्याचा प्रयत्न केला जाईल.

✻ थकबाकी :

दि. ३१ मार्च २०२१ अखेर कर्जाची येणे बाकी रू. २४,४८१.८० लाख असून त्यापैकी रु. १,३०३.८१ लाख इतकी थकबाकी आहे. थकबाकीचे एकूण कर्जाशी प्रमाण ५.३२ % इतके आहे. थकबाकी कमी असणे हेच सदृढ बँकेचे लक्षण आहे. संचालक मंडळ, अधिकारी वर्ग व सर्व कर्मचारी वर्गाने अथक प्रयत्न करून थकबाकीचे प्रमाण कमी ठेवले आहे. तसेच सभासद थकबाकीदारांनी त्यांचेकडील संपूर्ण थक रक्कम विनाविलंब भरून बँकेस सहकार्य करावे अशी विनंती मी करू इच्छितो.

✻ उत्पन्न संकल्पना, जिंदगीची वर्गवारी व तरतुदी : (NPA)

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुत्पादीत कर्जाचे वर्गीकरण करून याबाबतच्या सुचनांचे पालन केलेले आहे. अहवाल साल अखेरीस एकूण कर्जे रू. २४,४८१.८० लाख इतकी असून त्यापैकी रू. १,१५३.५६ लाख इतक्या रकमेची कर्जे अनुत्पादीत कर्जे आहेत. दिनांक ३१ मार्च २०२० रोजी अनुत्पादीत कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ४.६२% इतके होते. ते यावर्षी दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी हे प्रमाण ४.७१% इतके झाले आहे. या संपूर्ण अनुत्पादीत कर्जांची तरतूद केलेली असून अनुत्पादीत कर्जासाठी केलेल्या तरतूदीची (संशयीत व बुडीत कर्ज निधी) रक्कम रू. ३,१८९.०२ लाख इतकी आहे. दि. ३१ मार्च २०२१ चा नेट एन.पी.ए. २.८८% आहे. त्या व्यतिरिक्त उत्पादक कर्जाकरीता रू. ११५.०० लाख इतकी तरतूद केली आहे.

✻ कोअर बँकींग प्रणाली : (CBS)

फेब्रुवारी २०१४ पासून सर्व शाखांमध्ये कोअर बँक प्रणाली (सी.बी.एस.) कार्यान्वयीत करणेत आली असून आता आपल्या खातेदारांना कोणत्याही शाखेतून आपले व्यवहार करणे शक्य झाले आहे. तसेच मोबाईल बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी, एटीएम, पॉस, ईसीएस, बीबीपीएस, आधार कार्ड लिंक सबसिडी, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने यासारख्या सर्व सुविधा बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

✻ विमा व म्युचअल फंड :

बँकेच्या सर्व ग्राहकांना विमा सेवा उपलब्ध करून देणेसाठी बँकेने एस.बी.आय. लाईफ इन्शुरन्स कंपनी लि., दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., स्टार हेल्थ इन्शुरन्स, डिजीट जनरल इन्शुरन्स या कंपन्यांबरोबर गठबंधन (टाय अप) केले आहे. तसेच म्युचअल फंड सेवेसाठी एस.बी.आय. म्युचअल फंड, आयसीआयसीआय म्युचअल फंड, ॲक्सिस म्युचअल फंड, युटीआय म्युचअल फंड, एलआयसी म्युचअल फंड या कंपन्यांबरोबर सुद्धा गठबंधन (टाय अप) केले आहेत. झीरोदा स्टॉक ब्रोकिंग कंपनी लि., यांचेशी टाय अप करून बँकेच्या ग्राहकांना ऑनलाईन शेअर ट्रेडींग सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वरील व्यवसाय करणेसाठी आवश्यक असणारे वैधानिक परवाने संबंधित संस्थांकडून प्राप्त झाले आहेत. या व्यवसायामधून बँकेच्या नफा वाढीसाठी मदत होणार आहे. तरी सर्व सभासद, ठेवीदार यांनी सेवेचे लाभ घ्यावा.

✻ शाखा विस्तार :

बँकेच्या एकूण १६ शाखा कार्यरत असून या सर्व शाखांचे काम समाधानकारक आहे.

✻ वैधानिक लेखापरिक्षण :

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण मे. ए. डी. शिंदे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट यांनी केलेले असून त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेचा ऑडिट वर्ग 'अ' कायम केला आहे. लेखापरिक्षणाच्यावेळी त्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सुचना यांचा बँकेच्या कामकाजामध्ये निश्चितच उपयोग होईल.

✻ कार्यक्षेत्र :

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे.

✻ ठेवीवरील विमा संरक्षण :

डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन, मुंबई यांचेमार्फत आपले बँकेकडील प्रत्येक ठेव खातेदाराचे रू. ५,००,०००/- पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण उपलब्ध आहे. बँकेने सप्टेंबर २०२१ पर्यंतचा ठेवीवरील विम्याचा हप्ता कार्पोरेशनकडे पाठवला आहे.

✻ संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना तसेच संबंधितांच्या उद्योगधंद्यांना कर्ज देण्याबाबत रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले असून अहवाल सालात कोणत्याही संचालकास व त्यांच्या नातेवाईकांना कोणतेही कर्ज दिलेली नाही.

✻ संचालक मंडळ सभा :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १३ व कर्ज मंजूर समितीच्या २६ सभा झाल्या असून संचालक मंडळाने सर्व निर्णय एकमताने घेतलेले आहेत.

✻ नफा विभागणी :

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात आपल्या बँकेस रु. ४,२२,५८,३४४.७७ इतका निव्वळ नफा झाला आहे. गतवर्षाचा शिल्लक नफा रू. ६७८.५३ व या आर्थिक वर्षाचा नफा मिळून रु. ४,२२,५९,०२३.३० ची नफा विभागणी खालीलप्रमाणे करण्याची संचालक मंडळाने शिफारस केली आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी ही विनंती.

तपशील	रक्कम रुपये पैसे
१) राखीव निधी (२५% पेक्षा कमी नाही)	१,०६,००,०००.००
२) तंत्रज्ञान निधी	२०,००,०००.००
३) गुंतवणूक चढउतार निधी	२,०६,२७,८९०.००
४) संचालक आणि सेवक ट्रेनिंग फंड	२,००,०००.००
५) लाभांश समिकरण निधी	१७,००,०००.००
६) इमारत निधी	३,००,०००.००
७) लाभांश (१२% प्रमाणे)	६८,३०,९४९.००
८) शिल्लक नफा	१८४.३०
एकूण	**४,२२,५९,०२३.३०**

✻ लाभांश :

लाभांश वाटप करताना सभासदांचे हित साधण्याबरोबरच भांडवल वाढविण्याचा समतोल राखत बँकेने सन २०२०-२१ सालाकरीता १२% लाभांश वाटपाची तरतूद केली आहे.

✻ संचालक मंडळ व कर्मचारी प्रशिक्षण :

बँकिंग व्यवसायांतर्गत ध्येय धोरणात दिवसेंदिवस घडत असलेल्या बदलांचा मागोवा घेण्यासाठी व त्यानुसार आपल्या बँकेच्याही कार्यप्रणालीत बदल घडविण्यासाठी निधी व्यवस्थापन, थकबाकी वसुलीबाबत कायदेशीर बाबी, संगणकीकरण इ. विषयावर वेळोवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कृषी व बँकींग महाविद्यालय पुणे, गुलाबराव पाटील सहकारी प्रशिक्षण केंद्र, सांगली बँक असोसिएशन सांगली व कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणकरीता आपले अधिकारी व कर्मचारी पाठविण्यात आले होते.

✻ कर्मचारी वर्ग :

व्यवस्थापनाने आखलेली ध्येय धोरणे प्रत्यक्षात आणणारा महत्वाचा घटक म्हणजे कर्मचारी होय. सद्याच्या स्पर्धेच्या युगात ग्राहकांना कार्यक्षम व तत्पर सेवा देऊन बँकेच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी कर्मचारी वर्गाने कार्यक्षमपणे केलेली आहे. दि. ३१ मार्च २०२१ अखेर बँकेकडे एकूण १०७ इतका कर्मचारी वर्ग कार्यरत आहे.

✻ कृतज्ञता व आभार :

बँकेच्या दैनंदिन व्यवहारामध्ये ज्या ज्या व्यक्तींनी बहुमोल सहकार्य केले त्यांचे ऋणनिर्देश व कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांनी बँकेवर निस्सिम प्रेम व आपुलकी व्यक्त केली आहे. त्याबद्दल त्यांचे संचालक मंडळाचेवतीने आभार मानतो.

समाजातील सर्व घटकांचा आर्थिक विकास व्हावा म्हणून हुतात्मा संकुलाचे नेते **मा. वैभव (काका) नायकवडी** यांनी १५ ऑगस्ट १९९६ रोजी हुतात्मा बँकेची स्थापना केली. कर्मचाऱ्यांच्या कामात गतीमानता येवून कार्यक्षमता वाढावी, बँकेची प्रगतीपथावर वाटचाल व्हावी तसेच भारतीय रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांच्या मार्गदर्शक तत्वानूसार बँकेचे स्वच्छ व पारदर्शक काम चालावे याकरिता दैनंदिन कारभारात संस्थापक **मा. वैभव (काका) नायकवडी** यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.

माजी केंद्रिय मंत्री खा. श्री. शरदचंद्रजी पवार, मा. नामदार श्री. उद्धवजी ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. नामदार श्री. अजित (दादा) पवार,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट राज्य, **मा. नामदार श्री. बाळासाहेब पाटील,** सहकार व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य, **मा. श्री. अनिल कवडे,** सहकार आयुक्त, पुणे, **मा. श्री. शैलेश कोथमिरे,** अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, **मा. श्री. श्रीकृष्ण वाडेकर,** विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, **मा. श्री. निळकंठ करे,** जिल्हा उपनिबंधक, सांगली,

मा. श्रीमती रंजना बारहत्ते, सहाय्यक निबंधक, इस्लामपूर, तसेच बँकेच्या संचालिका व हुतात्मा बझारच्या कार्यवाह **सौ. नंदिनी (काकी) नायकवडी,** क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय वाळवाच्या **प्राचार्या डॉ. सुषमा अरुण नायकवडी** व हुतात्मा दूध संघाचे चेअरमन **मा. श्री. गौरवभाऊ नायकवडी** या मान्यवरांनी बँकेस वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायती, सहकारी संस्था, गांव कामगार तलाठी, महसूल विभाग, सर्व बँकर्स व संस्था व त्यांचे पदाधिकारी यांनी वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार मानने माझे कर्तव्य समजतो. तसेच बँकेस पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि., हुतात्मा दूध उत्पादक संघ लि., हुतात्मा बझार या सर्व संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, सेवक वर्ग यांचेकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

आपल्या बँकेचे संस्थापक चेअरमन **अरुण (भैय्या) नायकवडी** यांचे प्रेरणादायी नेतृत्व व अमुल्य मार्गदर्शन नियतीने हिरावून घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाची पवित्र ज्योत भविष्यकाळात तेवत ठेवण्याची जबाबदारी पार पाडणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरणार आहे.

हुतात्मा किसन अहिर विद्यालय, जिजामाता विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, हुतात्मा किसन अहिर शिशुविहार व प्राथमिक शाळा, क्रांतिसिंह नाना पाटील सह. शेती माल प्रक्रिया संस्था, क्रांतिसिंह ग्रेप ग्रोअर्स, हुतात्मा नागरी पतसंस्था, हुतात्मा कारखाना कामगार पतसंस्था, हुतात्मा नर्सिंग कॉलेज तसेच इतर अनेक सहकारी संस्था व हितचिंतक यांचेकडून वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

योगदान देणाऱ्या माझ्या सर्व सहकारी संचालकांचे, बँकेचे अधिकारी, कर्मचारी व हुतात्मा समुहाचे आभार मानतो. या बँकेची थोर परंपरा, नावलौकिक व व्यवसाय विकास यापुढेही सतत वाढत जावो यासाठी आपल्या सर्वांच्या सदिच्छा व सहकार्याच्या भावना सतत मिळत राहो, अशी अपेक्षा व्यक्त करतो व हा अहवाल आपल्यापुढे मंजूरीकरिता सादर करतो. धन्यवाद...!

जयहिंद.. **जय महाराष्ट्र...** **जय सहकार....**

आपला स्नेहांकित,
किरण नागनाथ नायकवडी
चेअरमन
हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

दि. ३१ मार्च २०२१

दि. ३१/३/२०२० रुपये	पैसे	भांडवल व देणी	रुपये	पैसे	दि. ३१/३/२०२१ रुपये	पैसे
१५,००,००,०००.००		**१) अधिकृत भाग भांडवल**	**१५,००,००,०००.००**		**१५,००,००,०००.००**	
५,३४,९२,२००.००		**२) वसूल भाग भांडवल**	६,४१,७५,८००.००		**६,४१,७५,८००.००**	
४७,६१,३८,०३९.००		**३) राखीव निधी व इतर निधी**			**५६,११,२१,६६८.००**	
९,५७,३१,७८६.००		१) राखीव निधी	११,०९,४६,५८६.००			
५,५०,००,०००.००		२) इमारत निधी	५,५०,००,०००.००			
३२,००,०००.००		३) स्पेशल रिझर्व्ह फंड	३२,००,०००.००			
४१,८३,१५८.००		४) लाभांश समीकरण निधी	४५,००,०००.००			
२४,११,४०,०००.००		५) बुडीत संशयीत कर्जे निधी	२८,३६,४०,०००.००			
१,१५,००,०००.००		६) उत्तम जिंदगीवरील निधी	१,१५,००,०००.००			
२५,००,०००.००		७) धर्मादाय निधी	२५,००,०००.००			
१६,००,०००.००		८) सेवक कल्याण निधी	१७,००,०००.००			
३,५०,००,०००.००		९) गुंतवणूक चढउतार निधी	३,७०,७४,०००.००			
४,१६,०००.००		१०) भागभांडवल गुंतवणुक निधी	४,१६,०००.००			
११,९१,१०८.००		११) गुंतवणुक घसारा निधी	५२,५६,१०८.००			
२५,००,०००.००		१२) रौप्य महोत्सव निधी	२५,००,०००.००			
१०,००,०००.००		१३) संचालक आणि सेवक ट्रेनिंग फंड	२०,००,०००.००			
३५,००,०००.००		१४) टेक्नॉलॉजी फंड व सायबर सिक्युरिटी	५५,३७,०००.००			
१,७६,७५,९८७.००		१५) कोविड २०१९ बीडीडीआर	३,५३,५१,९७४.००			
४,१३,३०,४६,४३३.२४		**४) ठेवी**			**३,८३,७२,३७,७७५.६७**	
३,१६,०७,२६,५६१.३५		अ) मुदत ठेवी	**२,७८,५३,९६,७९८.९९**			
८५,६५,२८,५५७.८४		ब) सेव्हिंग्ज ठेवी	**८९,१५,२३,४६०.१४**			
८१,९६,७९,९१९.१८		१) व्यक्ती सेव्हिंग ठेवी	८५,५३,४३,५१९.६८			
३,६८,४८,६३८.६६		२) सेव्हिंग्ज सस्पेन्स	३,६१,७९,९४०.४६			
१०,८७,५७,८५३.७६		क) चालू ठेवी	**१५,४९,२२,०५६.२५**			
१०,८७,५७,८५३.७६		१) करंट ठेवी	१५,४९,२२,०५६.२५			
७०,३३,४६०.२९		ड) सी.सी. क्रेडिट बॅलन्स	**५३,९५,४६०.२९**			
०.००		**५) बाहेरील कर्जे**			**०.००**	
०.००		**६) वसूलीस घेतलेली बिले (उलट बाजू प्रमाणे)**			**०.००**	
३१,६१,९०,१५१.००		**७) थकव्याज तरतूद**			**३५,५१,९९,७२०.४१**	
३१,६१,९०,१५१.००		१) कर्जावरील थकव्याज तरतूद	३५,५१,९९,७२०.४१			
२,५९,९३,७१२.२०		**८) जादा व्याज व इतर तरतूद**			**३,१२,११,२३१.२०**	
२,२२,०९,६३७.००		१) कर्जावरील जादा व्याज तरतूद	२,७६,४६,६०७.००			
३७,८४,०७५.२०		२) विमा व इतर चार्जेस	३५,६४,६२४.२०			
३,०५,१७,८९०.००		**९) देणे व्याज**			**२,९५,६७,७८६.००**	
३,०५,१७,८९०.००		अ) ठेवीवरील व्याज	२,९५,६७,७८६.००			
०.००		**१०) शाखा जुळवणी**			**०.००**	
४,७०,८९,१५१.२४		**११) इतर देणी व तरतुदी**			**७,९०,५१,४८२.३५**	
७,००,०००.००		१)वैधानिक लेखापरीक्षण फी	८,००,०००.००			
३,००,०००.००		२) अंतर्गत लेखापरिक्षण फी	५,००,०००.००			
३१,९५०.००		३) टेलिफोन	४३,९३३.००			
७९,०५,६९९.००		४) नोकर बोनस	७४,४४,८५९.००			
८०,४००.००		५) ऑफिस भाडे व लाईट बील देणे	७९,४४०.००			
४,२५,१६३.००		६) ड्राफ्ट पेएबल	३,०५,००,१८६.००			
१६,३२,०४२.००		७) इतर देणी	११,७७,०४२.००			
---		८) कर्मचारी उपदान (ग्रॅच्युइटी)	१२,०८,९६६.००			
३२,३७,३४०.६२		९) अनामत	३५,५६,२०३.०६			
५,०४,९६,९१,०२०.०६		**बेरीज पुढील पानावर**	**४,९२,३८,२४,६१०.३४**		**४,९५,७५,६५,४६३.६३**	

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

चा ताळेबंद

दि. ३१/३/२०२० रुपये	पैसे	मालमत्ता व येणी	रुपये	पैसे	दि. ३१/३/२०२१ रुपये	पैसे
७,६८,५०,३२०.२८		**१) रोख शिल्लक**	६,९५,०५,१७८.६७		**६,९५,११,१७८.६७**	
३,०००.००		**२) स्टँप इन हॅन्ड**	६,०००.००			
२५,६६,०८,८१०.२१		**३) बँक शिल्लक**			**२२,९८,४१,१२६.२८**	
२,००,०००.००		**अ) रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया**	**२,००,०००.००**			
६,५७,७८,४७४.९६		**ब) राज्य व जिल्हा मध्य बँकातील शिल्लक**	**७,९७,०६,२५२.९४**			
२,१५,४६२.६५		१) एम.एस्सी. बँक मुंबई (प्रधान कार्यालय)	१२,१५,४६२.६५			
५,९०,६७,८१६.९०		२) सांगली जिल्हा मध्य सह. बँक लि;	६,२३,५५,७८८.८०			
११,९३,४७७.४१		३) कोल्हापूर जिल्हा मध्य सह.बँक लि;	१,१५,६६,७९८.२१			
५३,०१,७१८.००		४) सातारा जिल्हा मध्य. सह बँक लि.,	४५,६८,२०३.२८			
१९,०६,३०,३३५.२५		**क) इतर बँकातील शिल्लक**	**१४,९९,३४,८७३.३४**			
५,६६,८४२.०६		१) स्टेट बँक ऑफ इंडिया	२८,०५,४१२.८६			
८३,४९,३३४.८४		२) बँक ऑफ बडोदा	५,७३,९५४.८४			
४,६१,५१४.८६		३) युको बँक	८९,४४७.६६			
३,८८,९०३.०१		४) बँक ऑफ इंडिया	०.००			
१५,५९,०६,७९३.५५		५) आय.डी.बी.आय बँक लि;	१२,८६,०७,२७७.७९			
३१,८६,२१०.३७		६) ॲक्सेस बँक लि;	२४,४६,२११.३७			
१,०००.००		७) एच.डी.एफ.सी.बँक लि;	०.००			
१,११,८५,१८७.२१		८) आय.सी.आय.सी.आय. बँक	१,४४,३७,६७२.६३			
३,५६,९४९.५६		९) टीजेएसबी बँक लि.,	२,७०,६९१.००			
६,९०५.६०		१०) आरबीएल बँक	०.००			
१,०२,२०,६९४.१९		११) इक्विटास स्मॉल फायनान्स बँक	७,०४,२०५.१९			
२,११,२३,४६,१३५.००		**४) गुंतवणूक**			**१,८०,००,१६,५०९.००**	
१,५२,५०,२८,३३३.००		**अ) सरकारी कर्जरोखे**	**९९,९४,८९,०५८.००**			
४,१५,५००.००		**ब) शेअर्स गुंतवणूक**	**४,१५,५००.००**			
१,०००.००		१) एम्.एस्.सी. बँक. लि; मुंबई	१,०००.००			
४,०१,०००.००		२) सांगली जि.म. सहकारी बँक लि;	४,०१,०००.००			
५००.००		३) हुतात्मा बझार, वाळवा	५००.००			
१,०००.००		४) हुतात्मा सह. दूध उत्पादक संघ वाळवा लि;	१,०००.००			
१०,०००.००		५) हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखाना लि;	१०,०००.००			
१,०००.००		६) सांगली जिल्हा सह. बोर्ड सांगली	१,०००.००			
१,०००.००		७) कोल्हापूर जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशन	१,०००.००			
५८,६९,०२,३०२.००		**क) मुदत ठेव**	**६३,०१,११,९५१.००**			
५,००,००,०००.००		१) सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक	०.००			
१,४९,०२,३०२.००		२) आय.डी.बी.आय. बँक लि;	१,६०,११,९५१.००			
५,००,००,०००.००		३) कोल्हापूर जिल्हा सहकारी मध्य बँक.	२०,००,००,०००.००			
२,५०,००,०००.००		४) आरबीएल बँक	२,९०,००,०००.००			
६,९०,००,०००.००		५) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक	४,३७,००,०००.००			
५,००,००,०००.००		६) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,	२५,००,०००.००			
८,४०,००,०००.००		७) सूर्योदय स्माल फायनान्स बँक	१५,००,००,०००.००			
५,००,००,०००.००		८) बँधन बँक	५,००,००,०००.००			
११,९०,००,०००.००		९) ए.यु. स्मॉल फायनान्स बँक	५,००,००,०००.००			
७,५०,००,०००.००		१०) इक्विटास स्मॉल फायनान्स बँक	८,८९,००,०००.००			
०.००		**ड) लिक्विड फंड गुंतवणूक**	**१७,००,००,०००.००**			
२,२२,०७,२९,८१०.००		**५) कर्जे**			**२,४४,८१,८०,००९.१९**	
९५,१५,७९,६६८.४१		**अ) अल्प मुदत कर्जे**	**१,२९,९२,१५,७६४.७४**			
९,५५,५८,७२७.००		१) सोने तारण कर्जे	२९,५९,८७,२६८.२०			
१४,९१,५६,३०९.००		२) ठेव तारण कर्जे	१४,८९,९५,५२६.००			
२,६९,०५,२३,३०१.४९		**बेरीज पुढील पानावर**	**२,५४,४३,५१,६०८.१५**		**४,५४,७५,४८,८२३.१४**	

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

दि. ३१ मार्च २०२१

दि. ३१/३/२०२० रुपये	पैसे	भांडवल व देणी	रुपये	पैसे	दि. ३१/३/२०२१ रुपये	पैसे
५,०४,९६,९१,०२०.०६		**मागील पानावरील बेरीज**	**४,९२,३८,२४,६१०.३४**		**४,९५,७५,६५,४६३.६३**	
३,२७,०५६.००		१०) प्रॉव्हिडंड फंड देणे	३,८७,३५०.००			
१२,८७,६८०.००		११) टी.डी.एस. देणे	५,०४,१६०.५०			
३२,०५,००३.००		१२) क्लोजिंग अलौन्स	४८,२५,०१४.००			
२६,४७,८३०.००		१३) राज्य सरकारी कर्ज माफी २००९	२६,४७,८३०.००			
१,३७,४०४.००		१४) क्लिअरींग ॲडजेस्टमेंट	०.००			
२,००,००,०००.००		१५) इन्कम टॅक्स देणे	१,४६,००,०००.००			
१५,८६,९३०.०६		१६) ए.टी.एम./आय.एम.पी.एस.	१५,८६,३६१.८०			
७४,१८७.४२		१७) ए.टी.एम.पी.ओ.एस. रिफंड	७०,०१६.९०			
१०,११,४००.०७		१८) सीजीएसटी देणे	१२,२२,८२६.७६			
१०,११,४००.०७		१९) एसजीएसटी देणे	१२,२२,८२६.७६			
७,००,१२१.००		२०) पगार देणे खाते	३२,४१,०४०.००			
७८,६१८.००		२१) विमा व व्यवसायकर देणे	,०.००			
७,०८,९२७.००		२२) फर्निचर बिल देणे	७,०८,९२७.००			
०.००		२३) कॉम्प्युटर ए.एम.सी. देणे	४,३८,९६०.००			
०.००		२४) आयकर येणे तरतूद	६,६६,९६०.००			
०.००		२५) युपीआय सेटलमेंट	७,७५,९०३.०८			
०.००		२६) कन्सलटन्सी देणे	२,९५,०००.००			
०.००		२७) आयजीएसटी देणे	१,१६६.४९			
०.००		२८) एटीएम एनएफएस	५,४६,५१०.००			
२,०३,७३,५२०.५३		**१२) नफा**			**४,२२,५९,०२३.३०**	
४१८.२४		१) मागील वर्षाचा शिल्लक नफा	६७८.५३			
२,०३,७३,१०२.२९		२) चालू नफा	४,२२,५८,३४४.७७			
		संभाव्य जबाबदारी				
		१) ग्राहकांच्या वतीने दिलेल्या बँक गॅरंटी १००% ठेवीच्या तारणावर रू. ३७,१०,०००.००				
		२) डीईएफंड रू. १०,००,४२७.६५				
५,१०,२८,४१,०९७.२१		**एकूण**	**४,९९,९८,२४,४८६.९३**		**४,९९,९८,२४,४८६.९३**	

मे. ए. डी. शिंदे ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट,कोल्हापूर
लेखापरिक्षक

किरण (दादा) नागनाथ नायकवडी
चेअरमन

श्रीकांत नारायण चव्हाण
जनरल मॅनेजर

अशोक रामू चौगुले
मुख्य कार्यकारी अधिकारी

हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा.

चा ताळेबंद

दि. ३१/३/२०२० रुपये	पैसे	मालमत्ता व येणी	रुपये	पैसे	दि. ३१/३/२०२१ रुपये	पैसे
२,६९,०५,२३,३०१.४९		**मागील पान बेरीज**	२,५४,४३,५१,६०८.१५		४,५४,७५,४८,८२३.१४	
१००.००		३) किसान विकास पत्र तारण कर्ज	४,८८,०००.००			
३५,४१,१८,०६०.१७		४) कॅश क्रेडिट कर्ज	३८,३३,५३,९३४.१८			
७०,३३,४६०.२९		५) कॅश क्रेडिट जमाबाकी	५३,९५,४६०.२९			
२९,२६,८१,०२०.१५		६) ठेव तारण कॅश क्रेडीट	२७,९४,०९,९५४.००			
५,१७,८४,९६२.४०		७) इतर तारण कॅश क्रेडीट	१२,९१,५४,९५४.८७			
१२,४७,०२९.४०		८) सोने तारण कॅश क्रेडीट	३८,३३,०८९.२०			
०.००		९) पिककर्ज	५,२५,९७,५७८.००			
